# माझे कुटुंब माझी जबाबदारी

## सामाजिक बांधिलकी आणि जाणीव



- संपादक -

डॉ. पंकजकुमार एस. नन्नवरे

डॉ. अनिल आर. बारी । डॉ. प्रशांत डी. कसबे

अथर्व

अथर्व पब्लिकेशन्स

माझे कुटुंब-माझी जबाबदारी
(सामाजिक बांधिलकी आणि जाणीव)
(Maze Kutumbh-Mazi Jababdari)

© सर्व हक्क सुरक्षित

ISBN : 978-81-953171-1-0
पुस्तक प्रकाशन क्र. ८११

प्रकाशक
युवराज भटू माळी

अथर्व पब्लिकेशन्स
धुळे : १७, देविदास कॉलनी, वरखेडी रोड, धुळे - ४२४००१.
संपर्क : ९४०५२०६२३०
जळगाव : शॉप नं.२, नक्षत्र अपार्टमेंट, शाहूनगर हौसिंग सोसायटी,
तेली समाज मंगल कार्यालयासमोर, जळगाव - ४२५००१.
संपर्क : ०२५७-२२३९६६६, ९७६४६९४७१७
ई-मेल : atharvapublications@gmail.com
वेबसाइट : www.atharvapublications.com
प्रथमावृत्ती : २३ जून २०२१
अक्षरजुळवणी : अथर्व पब्लिकेशन्स
मूल्य : ३५०/-

E-Book *available on*
**amazon.in ▪ GooglePlayBooks ▪ atharvapublications.com**

**ऑनलाइन पुस्तक खरेदीसाठी www.atharvapublications.com**

या पुस्तकातील कोणत्याही भागाचे पुनर्निर्माण अथवा वापर इलेक्ट्रॉनिक अथवा यांत्रिकी साधनांनी - फोटोकॉपिंग, रेकॉर्डिंग किंवा कोणत्याही प्रकारे माहिती साठवणुकीच्या तंत्रज्ञानातून प्रकाशकाच्या व लेखकाच्या लेखी परवानगीशिवाय करता येणार नाही. सर्व हक्क राखून ठेवले आहेत.

# -: अ नु क्र म णि का :-


- **माझे कुटुंब–माझी जबाबदारी**........................ ३१
  प्राचार्य डॉ. अतुल साळुंके
- **'माझे कुटुंब–माझी जबाबदारी' उपक्रमात राष्ट्रीय सेवा योजनेचे योगदान**........................ ३५
  डॉ. पंकजकुमार शांताराम नन्नवरे
- **'माझे कुटुंब–माझी जबाबदारी' मोहिमेत माझी जबाबदारी**.......... ४३
  डॉ. उज्ज्वला पंकज नन्नवरे
- **शासन ते कुटुंब...** ........................ ४९
  डॉ. अनिल रामदास बारी, सौ. प्राप्ती अनिल बारी
- **सामाजिक भान अन् जाणिवा**........................ ५३
  डॉ. दीपक मोतीराम मराठे
- **नागरिकांनो, धैर्य अन् संयम ठेवा...** ........................ ५६
  डॉ. सचिन जयराम नांद्रे
- **मोहिमेत 'रासेयो'ची भूमिका** ........................ ६३
  प्रतिभा विश्वनाथ लोणारी
- **प्लाझ्मा सेल्स दान करण्याची गरज**........................ ६८
  डॉ. राजेंद्रकुमार बन्सीलाल अहिरराव
- **समाजाप्रति हवे उत्तरदायित्व!** ........................ ८२
  डॉ. सर्जेराव गंगाधर गोल्डे
- **हे विश्वची माझे घर**........................ ९१
  गणपत विलास माखणे

- **मोहीम जाणीव–जागृतीची** ........ ९६
  डॉ. अक्षय किशोर घोरपडे
- **प्रत्येकाने राखले समाजभान** ........ १०३
  डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज
- **शासनाची पालकत्वाची भूमिका** ........ १०९
  गौतमी आनंद जगदेव
- **त्रिसूत्रीचा उपयोग कराच...** ........ ११८
  डॉ. दिनेश नागराज सूर्यवंशी
- **आपत्ती काळात मानसिक आधाराची गरज** ........ १२०
  डॉ. हेमंत घनश्याम भंगाळे
- **सामाजिक भान अन् जाणीव** ........ १२४
  डॉ. प्रभाकर गणपतराव जाधव
- **घरी राहा, सुरक्षित राहा अन् काळजी घ्या..** ........ १३०
  अमृता चव्हाण, ओमकार चव्हाण, डॉ. विलास कर्डिले
- **वाखाणण्याजोगी आरोग्य मोहीम** ........ १३३
  डॉ. प्रशांत धोंडिबा कसबे, डॉ. पंकजकुमार नन्नवरे
- **आरोग्याची महाचळवळ** ........ १३९
  डॉ. वंदना रवींद्र बडगुजर
- **घेऊया आरोग्याची खबरदारी** ........ १४५
  प्रा. अजय माणिक पाटील
- **माझे आरोग्य–माझी जबाबदारी** ........ १५१
  डॉ. दीपक पिराप्पा जाधव

# प्रत्येकाने राखले समाजभान

**डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज**
मराठी विभागप्रमुख,
एस. एस. गर्ल्स कॉलेज, अन्सारी वॉर्ड,
विठ्ठलनगर, गोंदिया

वर्तमान युग हे जागतिकीकरणाचे युग असून, 'खाउजा' ही शब्दत्रयी आपणा सर्वांना परिचित आहे. खासगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरण या तिन्ही बाबी आर्थिक क्षेत्रात पसरत-पसरत आता मानवी जीवनाच्या सर्व क्षेत्रांना व्यापत आहेत. भाषिक, साहित्यिक यासंदर्भातही जागतिकीकरणाची मर्यादा विस्तारत आहे. भाषेच्या क्षेत्रात जागतिकीकरणाचा आवाका वाढत असून, साहित्य क्षेत्रही दूर राहिलेले नाही. मराठी भाषेच्या आणि साहित्याच्या अनेक वेबसाइट बसल्या जागेवर सहज उपलब्ध होत आहेत. आजच्या या कोरोनाग्रस्त काळात जिथे जीवन जगणे अशक्य होऊन बसले आहे, मृत्यूचे सावट पसरत चालले आहे, अशा भयग्रस्त दशेत अनेक उपयोगी आणि निरुपयोगी दिशाभूल करणाऱ्या खोट्या-खऱ्या घटनांचा आढावा घेणाऱ्या व्हिडिओंचा यू-ट्यूबवर सुळसुळाट झालेला आहे. रोजच्या बातम्यांमुळे जग अगदी हाकेच्या अंतरावर आल्यासारखे वाटते. मृत्यूचे थैमान चोहीकडे माजले असून, प्रत्येक जण कोरोनाच्या भीतीने ग्रासला आहे. सार्वजनिक क्षेत्रे, कार्यालये, शाळा, महाविद्यालये सोडा; परंतु घरीही सुरक्षिततेची हमी राहिली नाही. सुरवातीचा काळ हा एक-दुसऱ्यांना सांभाळण्यात गेला. कुठे अन्नधान्य पुरवठा, कुठे औषधी पुरवठा, तर कुठे सुरक्षिततेच्या म्हणजे मास्क, सॅनिटायझर पुरवठा अशा उपक्रमांतून माणसे जवळ आली, असे वाटू लागले. मधल्या म्हणजे जुलैच्या काळात कोरोनासोबत जगण्याची सवय पडते की काय, असा भास निर्माण झाला. पण, सप्टेंबर महिन्यात मात्र सर्वत्र मृत्यूचे सावट पसरले. प्रत्येक जण भयग्रस्त होऊन स्वत:ला सांभाळू लागला आणि दुसऱ्याकडे शंकाग्रस्त नजरेने पाहू लागला. जीवन अगदी थांबल्यासारखे झाले. सुरवातीला घरात कुटुंबासोबत वेळ घालविणे आनंदाचे वाटत होते. नंतर सुसह्य होऊ लागले आणि आता तर तेच जीवन असह्य होऊ लागले. प्राथमिक शालेय दशेतील मुले कंटाळली.

ऑनलाइन शिक्षण म्हणजे मोबाइल वापरण्याचा परवाना ही समजूत होऊन अधिकाधिक मोबाइल आपल्या हातात कसा टिकेल, याचा आटोकाट प्रयत्न कधी प्रेमाने, तर कधी रागाने आणि रडण्याने करू लागली. मोठी मुले आधीच मोबाइलच्या अधिनस्थ असल्यामुळे त्यांना हे फुरसतीचे दिवस आवडू लागले. स्त्रियांनाही आता नवनवीन पदार्थ करण्याचा कंटाळा आला; अन्यथा मे-जून-जुलै या काळात व्हॉट्सअॅपच्या स्टेटसमध्ये नवनवीन पदार्थांचे फोटो पाहून स्त्री क्षेत्र हेच का, असा प्रश्न पडू लागला होता.

आता कुठे म्हणजे सप्टेंबरमध्ये बाहेर निघण्याची मोकळीक मिळत असून, कार्यालयीन कामकाज, महाविद्यालयीन कर्मचारी यांचे येणे-जाणे सुरू झाले. पण, कोरोनाने त्यांच्यावर प्रभाव गाजवायला सुरुवात केली. अगदी नवतरुणही स्वत:चा यापासून बचाव करू शकत नाही. दिवसेंदिवस कोरोनाग्रस्तांचा आकडा वाढतच चाललाय आणि संबंध दूरध्वनीच्या चौकशीमुळे असून, अतिकाळजीमुळे दुरावत चालल्यासारखे वाटतात. फक्त सूचना देऊन काळजी व्यक्त करणारे, इतकी काळजी व्यक्त करतात की घाबरवून सोडतात? प्रसारमाध्यमांनी अजूनच कहर ज्ञीपश. आता (स्व.) अभिनेता सुशांतसिंह राजपूतच्या मृत्यू प्रकरणातील चौकशी, आरोपी, खटला यांच्या बतावणीमुळे कोरोना कहर मीषडयाने कमी केला आहे. तेव्हा प्रत्येक बातमी वाहिनीवर सुशांत-रियाशिवाय काहीही नाही. पावसाळी अधिवेशन, देशातील हलाखीची परिस्थिती, गोरगषरबांचे जीवन, नवनवीन कृत्यी- घटना यांना दुय्यम नव्हे; तिय्यम स्थानही प्राप्त झाले नाही. कोरोना तरी दुय्यम स्थानावर आहे. अशातच चीनचा आक्रस्ताळेपणा, जगाला संकटात टाकून अन्याय करायला निघाला. त्या अन्यायात भारताचा पहिला क्रमांक असून, विविध मार्गांनी भारताला परास्त करण्याची शकले शोधून त्यावर अंमलबजावणी करीत आहे. भारतीय सीमेवरील हे संकट आणि भारतीय सामान्य मानवी जीवनावरील कोरोनाचे संकट, अशा दुहेरी संकटात भारतीय राज्यव्यवस्था सापडली आहे. अशा अवस्थेतील मानवी जीवन विस्कळित झालेले आहे. आताच आनंदवन संस्थापक महामानव बाबा आमटे यांच्या कुटुंबातील तिसऱ्या पिढीतील एकुलत्या एक कन्येने केलेली आत्महत्या हे एक अनाकलनीय गूढ घडले आणि बौद्धिकतेला तडा गेला. ज्या कुटुंबाने समाजसेवेकरिता आपले संपूर्ण जीवन खर्ची घातले, त्या कुटुंबातील एकुलत्या एक कन्येला, कर्तबगार कन्येला, यशाच्या उंच शिखर गाठण्यापर्यंत पावले टाकणाऱ्या तरुणाईला अवघ्या ३९ व्या वर्षी जीवन संपवावेसे वाटले, ही मानवी जीवनाची विफलता आहे, असे वाटते. जेव्हा सुशांतसिंह आणि डॉ.शीतल आमटे करजगी यांच्या बातम्या कानावर आल्या, तेव्हा कोरोना म्हणजे नैसर्गिक

किंवा मानवनिर्मित आपत्ती असून, त्यावर मानव आपल्या अफाट बुद्धीने या आपत्तीवर मात करेलच. पण, ही मानसिक आपत्ती कशी काय दूर करता येईल, हा अनुत्तरित प्रश्न निर्माण होऊन सतत भेडसावत राहतो. असो. मानवी जीवनात अनेक नको असलेले प्रश्न उपस्थित होतात आणि त्यांचे उत्तरही नकारात्मकच येते. कारण, त्यांचा जन्मच नको, नकारातून होत असतो.

अशीच नकारात्मकता असलेल्या जीवनात एक सकारात्मकता आणण्याचे काम या कोरोना नावाच्या महामारीने केलेले आहे, असे लक्षात येते. 'नोव्हेल कोरोना विषाणू' (कोविड-१९) या नावाने जागतिक संकट नोव्हेंबरमध्ये चीनच्या वुहान शहरात जन्माला आले आणि संपूर्ण जगात आपले पाय पसरवून २१८ देशांतील अर्थव्यवस्था, राज्यव्यवस्थेला, महासत्तांना हादरवून सोडले. जगात या महामारीने इतके थैमान माजवले की, माणूस स्वत:ला एका खोलीत बंद ठेवून जगू लागला आणि तेच त्याच्या हिताचेही आहे. जानेवारी २०२० मध्ये जागतिक आरोग्य संघटनेने या आजाराची घोषणा केली आणि मार्च २०२० मध्ये कोविड-१९ ने जागतिक महामारीचे रूप घेतले. हवा, स्पर्श याद्वारे पसरणाऱ्या या महामारीचे मनुष्याच्या नाक, त्वचा, जीभ या तीन ज्ञानेंद्रियांनाच सीमित करून टाकले. अशा अवस्थेत कितीतरी संकट सामान्य मनुष्याच्या जीवनात 'आ'वासून उभे राहिले.

समाजाच्या विविध पातळ्यांवर अत्यंत अटीतटीचे म्हणजे जगण्या-मरण्याचे प्रश्न निर्माण झाले. महामारीमुळे होणारे मृत्यू वेगळे, पण भुकेने, निवारा नसल्यामुळे, आधार नष्ट झाल्यामुळे होणारी उपासमार, जीवनाची वाताहत ही अत्यंत वेदनादायी होती, पण या वेदनेला शांत करणारे हात समाजाच्या शब्दांच्या वेगवेगळ्या स्तरांतून पुढे आले. अशा आणीबाणीच्या काळात एकसंध समाज पुढे येताना राष्ट्र बळकट आहे, याची जाणीव निर्माण होते. विषमतेमुळे आतून पोखरलेला समाज कधी एकसंध होईल की नाही, हा वैचारिकतेला सतत सतावणारा प्रश्न या महामारीच्या काळात सुटलेला दिसतो. राष्ट्रासाठी असा एकसंध समाज निरंतर, तत्पर असला तर त्या देशाची, राष्ट्राची प्रगती कधीही थांबत नाही. या महामारीच्या काळात कोरोनाग्रस्त शवांचे अंत्यसंस्कार करण्याकरिता आप्तस्वकियांना मज्जाव होता, तेच संस्कार ग्रामीण-शहरी भागातील शासकीय सेवेत नसलेल्या कितीतरी संस्थांनी, कार्यकर्त्यांनी केले. शासनानेही त्यांच्या या अत्यंत जबाबदारीच्या, पण जिवाला धोका असणाऱ्या कार्याचा मोबदला म्हणून पंचवीस लाख रुपयांचा विमा संरक्षण देण्याची घोषणा केली. ग्रामविकासमंत्री श्री. हसन मुश्रीफ यांनी ही मोहीम अगदी ग्रामीण पातळीपर्यंत पोहोचविली.

ही महामारी संसर्गजन्य असून, आपल्या जवळच्या नातेवाईकांचे अंत्यदर्शनही मनुष्याला घेता येत नाही, अशा परिस्थितीत सामाजिक संस्थांमधील कार्यकर्ते आपला जीव धोक्यात घालून हे कार्य करीत असतात. त्यांच्या जिवाची हमी घेणारा किंवा कुटुंबियांना दिलासा देणारा हा विमा कोरोनासंदर्भातील गंभीरता व्यक्त करणारा आहे. याशिवाय, भारतात मार्चपासून तर आतापर्यंत अनेक सण, व्रते, सोहळे सार्वजनिकरीत्या करण्यात येत होते. गणेशोत्सव, नवरात्रोत्सव, दसरा, पोळा हे सण सामाजिक भान राखून शांतपणे पार पाडण्यात आले. समाजाने स्वत:च्या धार्मिक रीती-परंपरांना फाटा देत जगण्याची एक नवी रीत कायम केली. म्हणजे स्वत:च स्वत:वर बंधने घालणे, हे अत्यंत कठीण कार्य समाजघटकांनी केले. अर्थातच त्याला कायद्याचा, शासन दंडुकाचा भय होता. पण, स्वच्छता अभियान सतत राबविण्याची गरज पडणाऱ्या या भारतात हेही नसे थोडके, अशी स्थिती असताना भारतातील तरुणवर्ग हा अत्यंत जागरूक बनला. त्यातच महाविद्यालयीन तरुणांची कर्तव्यतत्परता वाखाणण्याजोगी आहे. प्रत्येक महाविद्यालयात असणाऱ्या राष्ट्रीय योजना विभागातील विद्यार्थी हा या महामारीच्या काळात क्रियाशील झाला. आपल्या भोवतालच्या गरजेनुसार, कार्य करणारी ही तरुणाईची निकोप, नि:स्वार्थी वृत्ती या काळात वेगळे रूप घेताना दिसून आली आणि येत आहे. कार्यक्रम अधिकारी आणि शासनाच्या निर्देशानुसार गाव पातळीवरील मास्क वितरण, सॅनिटायझर बनवून वितरण करणे, स्वच्छतेवर मार्गदर्शन, उद्बोधन, तळागाळातल्या लोकांची उपासमार होऊ नये म्हणून अन्नदान, अन्नधान्य वितरण, सामाजिक अंतर राखण्यासाठी विविध शासकीय व अशासकीय कार्यालयांमध्ये मदत करणे, औषधालये आणि धान्याच्या दुकानांतील मदत, विविध कला-कौशल्यांद्वारे समाजाचे उदबोधन, वातावरण शुद्ध राखण्यासाठीचे अनेकविध उपाय, अशा अनेक मोहिमांवर ही तरुणाई कार्य करीत गेली.

**'ढेकर तृप्तीची देऊनी, तृप्त होऊनी पोट भरून उठावे**
**हाती जादू प्रेमळ चेहरा, स्निग्ध स्मित ते नुसते पाहत राहावे...'**

असे आनंदाने गावागावांत दक्ष असलेले महाविद्यालयीन तरुण-तरुणी गावागावांत जनजागृती मोहीम राबविताना दिसत आहेत. शासकीय रुग्णालय, शासकीय कर्मचारी, पोलीस विभाग आणि सफाई कामगार वर्गाच्या कर्तव्यतत्परतेसोबतच राष्ट्रीय सेवा योजनेतील स्वयंसेवक आणि त्यांची कृती समाजाला नवी उभारणी देत आहे. गोंदिया जिल्ह्यातील न. मा. द. महाविद्यालयाचा विद्यार्थी आकाश नागपुरे आणि त्याची चमू वरील सर्व कार्यासोबत रक्तदान करण्याचे कार्य तत्परतेने करतो आहे. कुठल्याही गटाचे

रक्त रुग्णाला हवे असेल तर आकाशला सांगितले की तो रक्तदाता उभा करतो. ही गोंदिया जिल्ह्याचीच नव्हे; तर संपूर्ण भारतभर अशा विविधांगी चळवळी निःस्पृहतेने सुरू आहेत. अन्नदान, धान्य पुरवठा, निर्वासितांना घरी पोहोचविणे या समाजोपयोगी कृती गावागावांतून, जिल्ह्याजिल्ह्यातून होताना दिसताहेत. पण दुसरीकडे लूट, बलात्कार, हत्या आणि इतर अपराधही बंद झालेले नाहीत. समाज इतका जागृत झाला आहे की, स्वत:ची काळजी घेण्याकरिता त्याने आपल्या गरजांना आवर घातला. जीवनावश्यकतेतही थोडीफार चणचण सोसून आत्मनिर्भर बनण्याचा प्रयत्न करतो आहे. पण, अपराधी वृत्ती मात्र थांबविता येत नाही. काळ कोणताही असो; अपराधी आणि अपराध समाजात डोके वर काढतीलच, यावर कोणालाही जालीम उपाय शोधता येणार नाही. विशेषत: स्त्रियांच्या बाबतीतले कौटुंबिक, सार्वजनिक समाजबाह्य कृत्ये घडतच राहतील.

आतापर्यंतच्या या कोरोनामय काळात शासनाने राबविलेले धोरण महामारीला आटोक्यात आणण्याच्या प्रयत्नाचे होते. पण, हे प्रयत्न जेव्हापर्यंत व्यक्तीच्या वैयक्तिक व्यवहारापर्यंत पोहोचत नाहीत, तोपर्यंत ते यशस्वी होत नाहीत. शासकीय दंडुकांची कितीही भीती असली, तरी मनुष्य पळवाट काढतोच म्हणून कोणत्याही योजनेची, विकास आराखड्यांची यशस्विता शंभर टक्के संभाव्य होत नाही. उलट तेच 'शासनाने सांगितलेच आहे. पण आधी आपली वैयक्तिक जबाबदारी आहे' हे समजून कोणतेही नियम आचरणात आणले तर त्यांची यशस्विता शंभर टक्के होईल. पण असे घडत नाही.

कोरोना काळात स्वत:च्या स्वार्थाशी थोडीशी झटपट करावी लागली. गरजांची, सामूहिकतेची मोडतोड करावी लागली. हे करीत असताना जीवनावश्यक असलेले, पण दखल न घेतलेले अनेक अनुभव समाजाला आले आहेत. स्वत:च्या कौटुंबिक जीवनात रमणे, स्वत:चा वेळा सदुपयोगी लावणे, नवनवीन ऑनलाइन माहिति प्राप्त करणे, त्यातून विविध कौशल्ये आत्मसात करणे, पण हे करीत असताना नेहमीच्या दैनंदिनीबद्दल जो एक कंटाळवाणा त्रासिक आर्विभाव मध्यमवर्गीय नोकरदार वर्गात होता, तो आता सकारात्मक रूप घेताना दिसतो आहे. टाळेबंदीच्या काळात जी निराशात्मकता आली, त्यामुळे दैनंदिन जीवनाची उपयोगिता, त्यातील धडपड, अपेक्षित यशाकरिता करावा लागणारा दैनंदिन प्रयत्न यांची आवड या काळात निर्माण झाली असून, समाज पुन्हा पूर्वपदावर येऊ पाहतो आहे. म्हणजेच या काळाने मनुष्याला पुनर्विचार करायला लावला आहे.

हा पुनर्विचार फक्त स्वत:च्या बाबतीतच नाही, तर सामाजिक पातळीवरही सामाजिक बांधिलकी लक्षात घेऊन झाला. टाळेबंदीच्या काळात काही विशिष्ट

घटकांकडून जे सामाजिक भान राखण्यात आले. त्यातील आपलेपणाची जाणीव महत्त्वाची असून भारतीय संस्कृतीच्या सर्वधर्मसमभावाला उजाळा देणारी ठरते. रक्तदान करणे, प्लाझ्मा सेल्स दान करणे, अन्नदान करणे, मास्क दान, सॅनिटायझर दान, धान्य दान ही भारतीय संस्कृतीतील दानत्वाच्या बाबींची आधुनिक आणि उच्च पातळी आहे, असे म्हणता येईल. म्हणजे जो समाज देवळात, ब्राह्मणांना दान देण्यात धन्यता मानायचा, त्याच समाजाने सामाजिक पातळीवर धर्म, पंथ, जात, वर्ग न पाहता ही दान क्रिया पार पाडली, तर कुठे-कुठे आजही सुरू आहे. म्हणूनच 'माझे कुटुंब-माझी जबाबदारी' एवढेच न म्हणता 'माझे कुटुंब-माझा समाज' ही माझी जबाबदारी अशा दृष्टिकोनाने व्यवहार करणाऱ्या, सामाजिक बांधिलकी जोपासणाऱ्या समाजाची तरूण पिढी नक्कीच भारताच्या विकासात मोलाचे सहकार्य करेल.

मानवाने 'माझे कुटुंब-माझी जबाबदारी' या शासनाच्या आदेशानुसार जीवन जगण्याची, कौटुंबिक काळजीची एक पायरी ओलांडून माझा परिसर, माझा समाज या पुढच्या पायरीवर पाऊल टाकले आहे. सामाजिक बांधिलकीतील हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे असून, मानवामानवातील परस्परसंबंध सामाजिक दृष्टीने अधिक मजबूत होतील, अशी आशा व्यक्त होते.

AN ISBN E-BOOK

# LIFE AND MOVEMENTS OF BIRSA MUNDA

EDITED BY
DR. MANOJ SAHARE

ISBN-978-81-928733-3-6

# Life and Movements of Birsa Munda

ISBN-978-81-928733-3-6

## INDEX



| Section-I<br>ENGLISH | | |
|---|---|---|
| Sr. No. | Chapter | Author |
| 1 | Impact of Birsa Munda on Indian Tribal Society and Feminist Movements | Mr. Gurpinder Kumar |
| 2 | Birsa Munda- A Real Freedom Fighter | Saifuddin Molla |
| 3 | The Indian Tribal Community Folk Hero- Birsa Munda | Merina Rahaman |
| 4 | Birsa Munda: Relevance of Thoughts & Message to the Tribal Community | Ishtiaq Ahmad |
| 5 | Birsa Munda –The Lion | Umesalma & Dr. Sudheendra Rao L N |
| 6 | Rethinking the Relevance of Birsamunda in the History of Tribal Movement with Reference to the Impact on the Minds of Tribal Population | Dr. Vijayakumari K |
| 7 | Birsa Munda: Reforming The Tribal Society | Dr.Rosy Bansal & Ms. Esha Bansal |
| 8 | Contribution of the Birsa Munda to the Indian National Freedom Struggle | Manoj Pralhad Bhagat |
| 9 | Nationalism and the Impact the Christian Missionaries on the Mundas in the 19th Century: The Story of Birsa Munda | Amita Esther David |
| 10 | Impact of Birsa Munda on Indian Tribal Community- An Analysis | Mr. R. Prabakaran |
| 11 | Legendary Birsa Munda | Latha G.M. |
| 12 | Atrocities against Tribals and Birsa Munda's Ulgulan | Dr. Pradnya Ghodwadikar |
| 13 | Reflection of Ulgulan | Romina Mahapatra |
| 14 | Birsa Munda and His Political Legacy | Rama Joshi |
| 15 | Birsa Munda and Nationalism in Colonial Bihar | Ajeet Kumar |
| 16 | Birsa Munda: The Brave Folk Hero | Wakil Kumar Yadav & Rahul Mishra |
| 17 | Birsa Munda: A Real Hero in the History of Tribal Liberation Movement | Surojit Koley |
| 18 | Birsa Munda's Contribution to Indian Freedom Struggle | Diksha Salve |
| 19 | Birsa Munda: Impact on Indian Tribal Community and His Message to the Humanity | Mukta Goyal |
| 20 | Life of Birsa Munda and Role of Tribal Leaders In Resistance Movement | D.T. Sakhare |
| 21 | Revolutionary Work of Birsa Munda | Anil Kumar |
| 22 | Political Legacy of Birsa Munda | Prof. Dyavappa L. Pawar |
| 23 | Impact of Birsa Munda on Adivasi Tribal Poetry | Dr. Dipak Ulemale |
| 24 | Tribal Resistance and Ulgulan | Dr. Manoj Sahare |

# Life and Movements of Birsa Munda

ISBN-978-81-928733-3-6

## Section-II
## HINDI


| Sr. No. | Chapter | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | अदम्य साहस एवं वीरता का पर्याय: बिरसा मुंडा | माधवी | 1-4 |
| 2 | बिरसा मुंडा का जीवन | डॉ. राम रहीम और कमलेश कुमारी | 5-8 |
| 3 | भारतीय स्वतंत्रता संग्राम मे बिरसा मुंडा का अविस्मरणीय योगदान | डॉ. मोनिका मित्तल | 9-14 |
| 4 | बिरसा मुंडा का जीवन कार्य | राकेश चौहान | 15-20 |
| 5 | बिरसा मुंडा का क्रांतीकारी कार्य | प्रा. निलेश पी. चोपडे | 21-24 |
| 6 | भारतीय स्वतंत्रता आंदोलन मे बिरसा मुंडा का योगदान | डॉ. विभा देशपांडे | 25-28 |
| 7 | बिरसा मुंडा की जीवनी: एक परिचय | प्रशांत कुमार | 29-32 |
| 8 | बिरसा मुंडा का जीवन और भारतीय स्वतंत्रता संग्राम में उनका योगदान | सौरभ मौर्या | 33-37 |
| 9 | बिरसा मुंडा का मानवता के लिये संदेश | राममिया चर्मकार | 38-45 |
| 10 | बिरसा मुंडा: जननायक और स्वतंत्रता सेनानी | डॉ. अनिल महादेवराव तिरकर | 46-52 |
| 11 | भारतीय स्वतंत्रता संग्राम मे बिरसा मुंडा का योगदान | संजीव कुमार सिंह | 53-60 |


## Section-III
## MARATHI


| Sr. No. | Chapter | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांचा भारतीय आदिवासी समुदायावर कार्य व प्रभाव | दत्तात्रय निवृत्ती रावण | 1-11 |
| 2 | आदिवासी कवितेतून बिरसा मुंडा यांचे आलेले क्रांतिकारी चित्रण: एक आकलन | डॉ. ललित अधाने | 12-21 |
| 3 | बिरसा मुंडा क्रांतिकारी महानायकाचे कार्य | डॉ. कविता राजभोज | 22-32 |
| 4 | बिरसा मुंडा एक लोकनायक | डॉ. रवी सोरते | 33-40 |
| 5 | राष्ट्रवादाचा अग्रदूत आणि जननायक: बिरसा मुंडा | डॉ. कविता तातेड | 41-49 |
| 6 | नागवंशीय आदिवासी बिरसा मुंडा आणि बौद्धधम्म | डॉ. प्रशांत बोबडे | 50-61 |

ISBN-978-81-928733-3-6

# बिरसा मुंडा क्रांतीकारी महानायकाचे कार्य

**डॉ. कविता मुरारीलाल राजाभोज**
*मराठी विभाग प्रमुख*
*एस.एस.गर्ल्स कॉलेज, गोंदिया.(महाराष्ट्र)*
*अंसारी वार्ड, विठ्ठल नगर, गोंदिया*

**प्रस्तावनाः**

"तुम्ही विश्वास ठेवा अंधाराला अंत
असतो सूर्यरथ घेऊन येणारा
कुणीतरी संत असतो"

आदिवासी समाजाकरीता सूर्यरथ घेऊन येणारा हा बिहारच्या झारखंडामधील उगवलेला क्रांतीसूर्य म्हणजे बिरसा मुंडा होय. भारताच्या स्वातंत्र्यलढयात आदिवासींचे ठामपणे नेतृत्व करून वयाच्या अवघ्या 25 व्या वर्षी शहीद होऊन इतिहासात अजरामर होणारा शूर योध्दा म्हणून सामान्य लोकांना त्यांचा परिचय आहे तर आदिवासींकरीता ईश्वराचा अंश म्हणून पूज्यनीय आहे. उलगुलान चे रणशींग फुंकणारे, इंग्रजांच्या दडपशाहीविरोधात आदिवासीच्या वनहक्क आणि स्वातंत्र्याकरीता लढत लढत प्राण त्यागणारे बिरसा मुंडा जिवट असे क्रांतिकारी होते.

**बिरसा मुंडा यांचे बालपण आणि धर्म परीवर्तनः**

भारताच्या बिहार राज्यातील रांची जिल्हा नैसर्गिक संपती, जंगलसंपतीने संपन्न असून पृथ्वीच्या पोटात अनेक खनिजेही साठवलेली आहेत. अशाच रांची पासून 60 कि.मी. दूर दक्षिण-पूर्व भागातील उलिहातू नावाच्या गावात मुंडा कुटुंब राहत असे. सुगणा मुंडा आणि करमी मुंडा या दांपत्यांला कामता नावाचा मुलगा आणि दसकीर व चंपा नावाच्या दोन मुली असून चवथे अपत्य म्हणजे बिरसा मुंडा होय. दिनांक 15 नोव्हेंबर 1975 रोजी बिरसा यांचा जन्म झाला. गुरूवारला हिंदीमध्ये बृहस्पतिवार म्हणतात, मुलाचा जन्म बृहस्पतिवारला झाला म्हणून बिरसा


१०:३५

ISBN-978-81-928733-3-6

हे नाव ठेवले. पुढे हेच नाव आदिवासींच्या जीवनाचा प्रकाशसूर्य बनले. सुगणा आणि करमी यांना पुन्हा पुत्र प्राप्ती झाली आणि कुंटुंब पूर्ण झाले तीन मुलं आणि दोन मुली अशा सप्तकोनी कुंटुंबात बिरसा हे अंत्यत चाणाक्ष आणि तेजस्वी होते.

**आदिवासी समूहाच्या मनातील विद्रोहः**

ख्रिस्ती धर्मप्रसारक आदिवासींना त्यांच्या जमीनीची लालूच दाखवून ख्रिश्चन धर्म स्विकारायला भाग पाडत होते. काही आदिवासींनी धर्मबदलाला विरोध करून एकत्र येण्याचा निर्धार केला. चाउबासा येथील मिश्नरी शाळेत झालेलया सभेत ख्रिश्चन पादरीने भारतीय व आदिवासी प्रथा-परंपराना चूकीचे ठरवून आदिवासी समाजाला असभ्य म्हणून अवमान केल्यामुळे बिरसाने उठून अत्यंत कठोर, इंग्रज व ख्रिश्चन विरोधी भाषण करून आवाहन दिले. मुख्य पादरी लूथरन यांनी बिरसाला समजवण्याचा प्रयत्न केला पण विद्रोहाची ठिणगी पेटली होती. बिरसा आपल्या विचारांना मागे घेणारे नव्हतेच परिणामी त्यांना शाळेतून काढण्यात आले. इथच बिरसाचे शिक्षण संपले.

अर्धवट शिक्षणाला राम राम ठोकून बिरसांनी आपल्या गावाला जवळ केले त्यांच्या जाईपर्यंत इंग्रजाच्या विरोधात बिरसाने केलेल्या भाषणाची किर्ती पोहचली होती. अशातच जवळच्या बंदगावातील आनंद पाडे या व्यक्तीचा परिचय झाला. हिंदू धर्म वेद, पुराण, उपनिषद्, रामायण, महाभारत, भगवतगीता इत्यादी विविध धार्मिक आणि सिध्दांतांची माहिती आनंद पांडे यांना होती. बिरसा त्यांच्या सोबत हिंदू धर्माच्या अनेक मुद्दयांवर गहन चर्चा करीत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली बिरसांनी हिंदू धर्मग्रंथाच्या अध्ययनाला सुरूवात केली.

**हिंदू धर्मात प्रवेशः**

आनंद पांडे आणि त्यांचे भाऊ सुखनाथ पांडे यांच्या सान्निध्यात हिंदू धर्माचे सखोल अध्ययन करून त्यांच्या लक्षात आले की ख्रिश्चन धर्म आणि हिंदू धर्मात जरी ईश्वरीय ज्ञान, आध्यात्मिकता

ISBN-978-81-928733-3-6

यांचा संदेश समान असला तरी धर्मपरीवर्तनासारखी कोणतीही गोष्ट हिंदू धर्मात नाही. हिंदू धर्मातही इतर धर्मासारखे दया, परोपकार, क्षमा, शांती, प्रामाणिकता, नैतीकता आणि सत्यतत्वावर मानवी जीवन आधारीत आहे. अशा अनेक मुद्दयांमुळे बिरसा हिंदू धर्माकडे आकर्षित झाले. त्यांना ख्रिश्चन धर्मापेक्षा हिंदू धर्म अत्यंत उपयुक्त आणि महत्वाचा वाटला. महाभारताची शिकवण, गीतेचा उपदेश या सर्वांच्या प्रभावामुळे बिरसांनी पुन्हा हिंदू धर्माचा स्विकार केला. हिंदू धर्म स्विकारल्यानंतर त्यांनी एकांतवासात चार वर्षे तपस्या केली. या काळात त्यांची वेशभुषा, आचार-विचार सर्वात अंतर्बाहय बदल झाला. अंगात पीतांबर आणि पायात खडाउ आल्या. लोक त्यांना आता महात्मा बिरसा म्हणू लागले.

**पंथाची स्थापनाः**

बिरसा मुंडाची ओळख आता एका वैद्यायाच्या रूपात झाली होती कारण कोणत्याही आजाराला वेगवेगळया वनस्पती च्या उपचाराद्वारे नष्ट करू लागले. उपचारासोबतच उपदेश देण्याचे कार्य बिरसा करत होते. दिवसेंदिवस लोकांची संख्या वाढत होती. आदिवासी समुदायाच्या विकासाकरीता एक नव्या पंथाची स्थापना केली. जून्या जाचक रूढी, पंरपरा नष्ट करून हिंदू धर्मातील आणि ख्रिश्चन धर्मातील विकास करणाऱ्या पंरपरांचे अनुकरण या पंथात होऊ लागले. आदिवासी समाजात गोवध निषिध्द ठरवून फक्त सिंगबोगा म्हणजे एकेश्वरवाद स्विकारला. बळीप्रथा नष्ट केली, स्वच्छतेचा पुरस्कार केला तसेच यज्ञोपवित धारण करण्याचा उपदेश केला. एकंदरीत हिंदू धर्मातील उच्च भावनांचा स्विकार या "बिरसैत" पंथात करायला लावला.

बिरसाचे हे सर्व आचरण ख्रिश्चन धर्माला आणि धर्मप्रचाराला आळा घालणारे होते इंग्रज आणि धर्म प्रचारक हे वेगवेगळे नसून एकाच नाण्याच्या दोन

ISBN-978-81-928733-3-6

बाजू आहेत हे बिरसाला केव्हाच कळले होते. म्हणून त्यांनी ख्रिश्चन धर्माविरूध्द ही धार्मिक चळवळ सुरू केली होती. ख्रिश्चन धर्म प्रचारकांना बिरसाचे हे कार्य म्हणजे धर्मप्रचारात खूप मोठी अडचण वाटली म्हणूनच त्यांनी बिरसाला विरोध करण्याकरीता जमीन मालकांची मदत घेतली.

**आंदोलनाची सुरूवातः**

धार्मिक आंदोलनाने हळूहळू राजकीय आंदोलनाचे रूप धारण केले. धर्मसुधारणेसोबतच समाजसुधारणा असे रूप ही चळवळ घेऊ लागली. कितीतरी मुंडा सरदार एकत्र येऊन या आंदोलनाला आपल्या अधिकाराचे, आत्मनिर्भरतेचे, गुलामीतून सुटका प्राप्त करण्याचे आंदोलन बनवून "सरदार आंदोलन" असे नाव दिले. आदिवासी समाजातील उपासमार, गरीबी, बेरोजगारी, अज्ञान हे सर्व नष्ट करून आदिवासी समूहाला पुढे आणण्याकरीता बिरसा समाजाला जागृत करू लागले. विविध सभांमध्ये मार्गदर्शन करत असता त्यांच्या वाणीला उग्र रूप येत होते. या सभांमध्ये आदिवासी सैनिक सहभागी होत असत. भूधारक, इंग्रज, धर्मप्रचारक-प्रसारक, आणि वनसंरक्षक कायदा या सर्वांच्या विरोधात बिरसाच्या नेतृत्वात हे आंदोलन अधिकाधिक तीव्र होऊ लागले. या आंदोलनाकरीता बिरसा मुंडानी काही नियम बनवून आचार संहिता बनवली. या नियमामध्ये शोषण करणाऱ्या प्रत्येक घटकाचा विरोध, ब्रिटीश शासनाच्या आदिवासी विरोधी नीतीवर बहिष्कार, आदिवासी वीरांच्या गाथांचे प्रसार प्रचार, 30 जून 1855 या दिवसाचा शहीद दिवस म्हणून गौरव करण्यात यावा. या दिवशी 30 हजार आदिवासी 'जमीर आंदोलनात' मृत्यूमूखी पडले होते. यात पुरूषच नव्हे तर आदिवासी स्त्रियांनीही भाग घेतला होता. या दिवसाला 'स्वर्ण रेखा' दिवसही म्हणतात. 1890 पासून सुरू झालेले हे आंदोलन पुढे ब्रिटीश दडपशाही आणि धार्मिक परिवर्तन या विरूध्द होते. शेषराव मडावी

ISBN-978-81-928733-3-6

हे नाव ठेवले. पुढे हेच नाव आदिवासींच्या जीवनाचा प्रकाशसूर्य बनले. सुगणा आणि करमी यांना पुन्हा पुत्र प्राप्ती झाली आणि कुंटुंब पूर्ण झाले तीन मुलं आणि दोन मुली अशा सप्तकोनी कुंटुंबात बिरसा हे अंत्यत चाणाक्ष आणि तेजस्वी होते.

**आदिवासी समूहाच्या मनातील विद्रोहः**

ख्रिस्ती धर्मप्रसारक आदिवासींना त्यांच्या जमीनीची लालूच दाखवून ख्रिश्चन धर्म स्विकारायला भाग पाडत होते. काही आदिवासींनी धर्मबदलाला विरोध करून एकत्र येण्याचा निर्धार केला. चाउबासा येथील मिश्नरी शाळेत झालेलया सभेत ख्रिश्चन पादरीने भारतीय व आदिवासी प्रथा-परंपराना चूकीचे ठरवून आदिवासी समाजाला असभ्य म्हणून अवमान केल्यामुळे बिरसाने उठून अत्यंत कठोर, इंग्रज व ख्रिश्चन विरोधी भाषण करून आवाहन दिले. मुख्य पादरी लूथरन यांनी बिरसाला समजवण्याचा प्रयत्न केला पण विद्रोहाची ठिणगी पेटली होती. बिरसा आपल्या विचारांना मागे घेणारे नव्हतेच परिणामी त्यांना शाळेतून काढण्यात आले. इथच बिरसाचे शिक्षण संपले.

अर्धवट शिक्षणाला राम राम ठोकून बिरसांनी आपल्या गावाला जवळ केले त्यांच्या जाईपर्यंत इंग्रजाच्या विरोधात बिरसाने केलेल्या भाषणाची किर्ती पोहचली होती. अशातच जवळच्या बंदगावातील आनंद पाडे या व्यक्तीचा परिचय झाला. हिंदू धर्म वेद, पुराण, उपनिषद्, रामायण, महाभारत, भगव्तगीता इत्यादी विविध धार्मिक आणि सिध्दांतांची माहिती आनंद पांडे यांना होती. बिरसा त्यांच्या सोबत हिंदू धर्माच्या अनेक मुद्दयांवर गहन चर्चा करीत. त्यांच्याच मार्गदर्शनाखाली बिरसांनी हिंदू धर्मग्रंथाच्या अध्ययनाला सुरूवात केली.

**हिंदू धर्मात प्रवेशः**

आनंद पांडे आणि त्यांचे भाऊ सुखनाथ पांडे यांच्या सान्निध्यात हिंदू धर्माचे सखोल अध्ययन करून त्यांच्या लक्षात आले की ख्रिश्चन धर्म आणि हिंदू धर्मात जरी ईश्वरीय ज्ञान, आध्यात्मिकता

ISBN-978-81-928733-3-6

म्हणजे 'बिरसाईट्स' होय. समाजजागृती करण्याच्या कार्यात हे बिरसाइट्स सतत सहकार्य करत असून बिरसासोबत राहत असत.

**बिरसा मुंडा यांची पहिली अटकः**

23-24 ऑगस्ट 1995 आणि यापूर्वी केलेल्या अनेक भाषणामुळे इंग्रज सरकार संतापले होते. शेवटी बिरसाच्या आंदोलनावर बंधन घालण्याकरीता 19 नोव्हेंबर 1895 ला बिरसा वर सरकारविरूध्द विद्रोह करण्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली. कधी सहकारी असलेल्या जमीनदार जगमोहनसिंहने फितूरी करून बिरसाला अटक करण्यास मदत केली. धार्मिक परिवर्तनाला आळा बसल्यामुळे पादरी चिडलेले होते, त्यांनी बिरसा विरोधात साक्ष देत बिरसाला सोडणे धोकादायक आहे असे न्यायालयाला निक्षून सांगितल्यामुळे बिरसाला 2 वर्षाच्या सश्रम कारावासात टाकण्यात आले. बिरसा दोन वर्ष तुरूगांत असताना इसाई धर्म प्रसारकांनी पुन्हा कितीतरी आदिवासींना धर्मांतर करवून ख्रिश्चन बनविले. एवढेच नव्हे तर त्यांच्या गैरहाजरीत वनकायदा अंतर्गत इंग्रज सरकारने आदिवासींच्या सर्व जमीनी सरकार जमा केल्या. 30 नोव्हेंबर 1897 रोजी बिरसाची तुरूगांतून सुटका झाली. बिरसाच्या सुटकेची बातमी वावटळासारखी पसरली आणि आदिवासीच्या जीवनात पुन्हा प्राणवायूचा संचार झाला. म्हणून वामन शेळमाके म्हणतात, "युवा क्रांतिकारक बिरसा मुंडाच्या नेतृत्वाने ब्रिटीश सरकार हादरले, बिरसाच्या आंदोलनाला मुंडा कोल, सिंधूकानू, सरदारी संघर्षाची धार होती. बिरसांची लढाई व आंदोलन हे सांस्कृतिक, धार्मिक, वैचारिक, संसाधन (जल, जंगल, जमीन) आणि स्वातंत्र्य अशा पाच प्रकारच्या स्तरावर एकाचवेळी सातत्याने सुरू होते. स्वातंत्र्याची पहिली ठिणगी पाडणारा, घोषणा करणारा क्रांतिवीर बिरसा मुंडा होता. "तुरुगांतून सुटून आल्यावर बिरसाने पुन्हा मुंडा


१०:३८

ISBN-978-81-928733-3-6

म्हणतात" बिरसाचे आंदोलन म्हणजे मानवी हक्काची, मानवाधिकारासाठी केलेली लढाई होती. आदिवासींना गुलामगीरीतून मुक्त करून शोषणमुक्त समाजाची, निर्मिती करणे हे त्यांचे स्वप्न होते. बहुजन वर्ग संघटीत, संघर्ष सिध्द झाला की माठाली सिंहासने सहज हालवू शकतो यावर त्यांचा विश्वास होता. म्हणूनच त्यांनी आपल्या बांधवास एकत्रित आणून त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा कार्यक्रम हाती घेतला."

1895 ला बिरसा यांनी स्वराज्याची घोषणा करून इंग्रज सरकारला उघड आव्हान दिले. आदिवासी आणि जंगल स्वतंत्र असल्यामुळे जंगलसंपतीवर आपलाच अधिकार असून कोणतेही कर देणे बंधनकारक नाही, आदिवासी धार्मिकतेने स्वतंत्र आहेत त्यामुळे कोणतेही बंधन आदिवासींवर लादू नये. आदिवासी स्त्रियांचे शारीरिक शोषण केले जाऊ नये, शोषण केले जात असेल तर कठोर शिक्षा व्हावी, आदिवासी मुलांना इतरांसारखे पूर्ण शिक्षण दिले जावे, कोणताही स्पृश्य-अस्पृश्य भेदभाव न पाळता आदिवासींना देवळात जाण्याचे स्वातंत्र्य हवे, आदिवासींवर लादलेले दास्यत्वाचे बंधन नष्ट व्हावे, आदिवासी क्षेत्रातील वनसंपती, जमीन, शेती यावर भूधारकांचे वर्चस्व नष्ट करून आदिवासींना त्यांच्या जमीनी परत कराव्या अशा अनेक समाजविकासाच्या मागण्या इंग्रज सरकारसमोर ठेवून बिरसा जनजागृती करू लागले. त्यांच्या मोहक वाणीने अनेक गैर आदिवासींनांही आपलेसे केले. आदिवासी समाजाची अवस्था इतकी दयनिय होती की या मागण्या म्हणजे आपले स्वर्गच आहे अशा भावनेमुळे बहूसंख्य समाज बिरसा मुंडाच्या आदोलनाला जोडला गेला. काही अत्यंत सक्रिय कार्यकर्तेही तयार झाले, आदिवासी सैनिक तर सोबत होतेच. या सर्व सहकार्यांना 'बिरसाईट्स' म्हणण्यात येत होते. कोणत्याही संकटाला, आव्हानाला आणि मृत्यूला न भिणारा

ISBN-978-81-928733-3-6

सरदारांना, अनुयायांना एकत्र करून वेगवेगळया वर्गात विभाजन करून सेवादल असे नाव देऊन 10 हजार आदिवासींना यात समाविष्ट करण्यात आले होते.

**जंगल राज्याची घोषणाः**

बिरसाने दिनांक 11.08.1898 ला जंगल राज्याची निर्मिती करून चार हजार मुंडाची सेना निर्माण केली तसेच जंगल राजचे योग्य प्रशासन चालविण्याकरीता मंत्रीमंडळाची निर्मिती केली. बंदगाव, तोरण, मुरूह, जसपूर, रामपूर, सरगुजा, जांजगीर, रायपूर हे जंगल राज्याच्या हद्दीत असल्यामुळे तिथले स्वराज्य सुराज्य व्हावे म्हणून बिरसा सतत प्रयत्नरत होते. याकरीता त्यांनी आपल्या सेना समूहाचे तीन गटात विभाजन केले.

1) प्रचारक किंवा गुरूः या श्रेणीतील सदस्य अत्यंत विश्वासू असून यांच्यासोबत गुप्त बैठकी घेऊन निर्णय घेण्यात येत असत.

2) पुराणिक अथवा पुरानकः या गटातील सदस्य खुल्या स्वरूपात विद्रोह करण्याकरीता नेहमीच तत्पर असत.

3) नायक किंवा ननकः आंदोलन करण्याची इच्छा असलेल्या सर्वांना इथे प्रवेश होता पण गुप्त सभेत यांचा सहभाग राहत नसे. यांना निर्णय कळविले जात असे.

मागच्या आंदोलनातील चूका यावेळेस होऊ नये म्हणून बिरसा खबरदार राहत असत. हे आंदोलन भारतभर पसरावे याकरीता त्यांनी स्वतः तिर्थयात्रेच्या नावावर अनेक स्थळांना भेटी दिल्या यात चुटिया यात्रा, पुरी यात्रा, नवरत्नगढ यात्रा हया महत्वाच्या यात्रा आहेत तर खूंटी, राची, चक्रधरपूर, बुण्डू, तमाड़, कर्रा, तोरपा, बसिया आणि सिसई सारख्या ठिकाणावर भेट देऊन सेना गठीत करण्याचे कार्य केले. या सर्व सेनेचे मुख्यालय खुंटी ठेवण्यात आले.

**सशस्त्र विद्रोहाची घोषणाः**

ISBN-978-81-928733-3-6

दिनांक 24 डिसेंबर 1899 रोजी सशस्त्र क्रांतीची घोषणा करण्यात आली. यापूर्वी विविध गुप्त सभा घेऊन प्रचारकांशी अनेक मुद्दयांवर चर्चा करून निर्णय घेण्यात आले. यात फेब्रुवारी 1998 ची डोंबरी सभा, मार्च 1998 ची सिंबुआ सभा आणि 22 डिसेंबरची स्मशान घाटातील सभा महत्वाच्या आहेत. यासर्व गोष्टींची थोडीफार भनक इंग्रजांना होती पण नाताळचा सण आणि योग्य पुराव्याअभावी इंग्रज सरकारला कोणताही निर्णय घेता आला नाही तरीही त्यांनी आपल्या गुप्त हेरांना, शिपायांना माहिती गोळा करण्याकरीता नेमलेच होते पण बिरसा समर्थकांनी त्यांच्या हाती काहीही लागू दिले नाही. 24 डिसेंबरला सशस्त्र क्रांतीचे रणशिंग फुंकून आदिवासींनी खुंटी, बसिया, तोरपा, कर्रा, तपाड, चक्रधरपूर या क्षेत्रात भयंकर तोडफोड आणि विषारी बाण चालविण्यात आले. शाळा, चर्च इत्यादींचीतोडफोड झाल्यामुळे इंग्रज सरकारने राची जिल्हयातील डिप्टी कमिश्नर ए.सी. स्ट्रीट फील्ड आणि काही सैनिकांना तपासणीकरीता पाठवले आणि त्यांच्या लक्षात आले की हे आंदोलन सहज माघार घेणारे नाही. पण तरीही सैन्याच्या अनेक तुकडया आंदोलन ठीकाणी तैनात करण्यात आल्या. बिरसाला शोधण्याकरीता अनेक प्रयत्न करण्यात आले पण समर्थकांमुळे बिरसाचा पत्ता लागला नाही.

दिनांक 05 जानेवारी 1900 रोजी एटकेडीह ला सभा घेण्यात आली या सभेचा नायक 'गया मुंडा' होता. सभेची माहिती इंग्रज सरकारला झाल्यामुळे त्यांनी त्या क्षेत्राला घेराव घातला पण यश मिळाले नाही. इग्रंजांशी प्रत्यक्ष सामना करण्याची ही पहिली वेळ होती, त्यात आदिवासींना यश मिळाले नाही पण नंतर कमिशन स्ट्रीटफील्ड ने गया मुंडाला त्याचे घर जाळून पकडले. यानंतर इंग्रज सरकारने दडपशाहीचे धोरण स्विकारून आदिवासी विद्रोहयांना पकडण्याकरीता जाळे पसरले. पण यश न आल्यामुळे

ISBN-978-81-928733-3-6

बिरसाच्या डोमबारी येथे बलात्कार आणि हत्येचे तांडव पसरवले. बिरसाला पकडण्याकरीता सापडे रचले.

**आंदोलन आणि बिरसाचा अंतः**

बिरसाला पकडण्याकरीता 19 जानेवारी पासून शोधा-शोध सूरू झाली. कमिश्नर थौमसन यांनी सैनिक व पोलीस अधिकाऱ्याना घेऊन संपूर्ण क्षेत्र पिंजून काढले पण बिरसाचा शोध लागला नाही. उलट बिरसाचे सहकारी मुंडा सरदार डोंका आणि माझिया ने आत्मसमर्पण केले. यांच्या आत्मसमर्पणामुळे विद्रोहाचा शेवट झाला. दोन सरदार मिळाल्यामुळे सरकारने पुन्हा बिरसाला पकडून देणाऱ्या लोंकाना बक्षीस देण्याची घोषणा केली. बिरसा आपल्या कुटुंबासह रानोमाळ भटकत होते. मनमारू आणि झरीकेल या गावाच्या सात लोकांनी बिरसाला पकडून देण्याचा ठाम निर्णय घेतला आणि ते रानोमाळ भटकू लागले. शेवटी यश आले पण जागृतावस्थेत बिरसाला पकडणे कठीण असल्यामुळे रात्री झोपले असता त्यांना कैद करून डिप्टी कमिश्नरला सोपविण्यात आले. ज्या लोकांसाठी बिरसाने आपले जीवन वेचले त्यांनीच विश्वासघात केला. बिरसाला रांची च्या कारागृहात पाठविण्यात आले. 9 मार्च 1900 ला झालेली अटक म्हणजे बिरसाचा अंत होता. कारागृहातही आपल्या सहकाऱ्यांची काळजी बिरसांना वाटत होती. त्यामुळे सहकाऱ्यांची बिरसाच्या आंदोलनाशी आपला सुतराम संबध नाही असे सांगावे अशी सूचनाही दिली.

बिरसाला कारावासातील हवामान मानवले नसल्यामुळे दिवसेंदिवस त्यांची प्रकृती खालावत गेली. कोर्टात टाकलेल्या बिरसाच्या सुटकेच्या खटल्याला तारीख वर तारीख मिळत होती. अशातच 8 जून 1990 ला त्याची प्रकृति अधिक बिघडली आणि 9 जून 1900 ला त्यानी आपला देह त्याग केला. एका प्रंचड क्रांतीवीरासकट क्रांतीयुगाचा अंत झाला. बिरसाच्या जन्माच्या वादाप्रमाणेच मृत्यूही

ISBN-978-81-928733-3-6

वादग्रस्त झाला. काहीच्या मते त्यांचा रहस्यमय मृत्यू झाला. तर काहींच्या मते त्यांना जेवणातून विषबाधा करण्यात आली होती. ब्रिटीश सरकारने मात्र मृत्यूचे कारण हैजा जाहिर केले होते. वय 25 वर्षेपूर्ण होण्याआधीच तेजस्वी क्रातीवीराचा मृत्यू आदिवासी समाजाला पोरके करून गेला. पण तरीही आजतागायत बिरसा मुंडाचे उलगुलान सुरूच आहे. अगोदर परक्या सरकार सोबत तर आता स्वकीय राज्यकत्र्यासोंबत, म्हणूनच वामन शेळमाके म्हणतात, "अशा या महामानवाचे संपूर्ण जीवन उलगुलानाला सतत उर्जा पुरविणारे न संपणारे इंधन आहे. जल, जंगल, जमिनीचा प्रणेता क्रांतीवीर बिरसाची विचारधारा युवकांनी समजून घ्यावी. सर्वहारा समाजाचे प्रेरणास्थान बिरसा मुंडाच्या विचारांनी संपूर्ण देश धगधगतो आहे."

**समारोपः**

बिहारमधील महान क्रांतीकारक योध्दा बिरसा मुंडा यांनी आदिवासी समाजाच्या उत्थानाकरीता आपले जीवन अर्पण केले. ब्रिटीश दडपशाही विरूध्द आंदोलनाचा लढा पूकारून जल, जंगल, जमीनीच्या स्वातंत्र्याकरीता आणि आदिम समाजाच्या विकासाकरीता सशस्त्र क्रांतीकारी उठाव करून ख्रिश्चन मिशनरींचा धर्म प्रसार आणि प्रचाराला आळा घालण्याचे कार्य तसेच सावकार, जमीनदार, भांडवलदार, मिशनरी या सर्वाच्या विरोधात जाऊन आदिवासी समूहासाठी समाजाला स्वातंत्र्य बहाल करून स्वराज्याची घोषणा करतात. भारतीय पंरपरा आणि धर्मानुसार आचरण करण्याचे आवाहन करून समाजाची पूर्नबांधणी केली. त्याच्या कर्तृत्वामुळे ते महात्मा बिरसा, धरती आबा आणि भगवान बिरसा बनले. अशा एका सामान्य व्यक्तिमत्वापासून तर भगवान बिरसा पर्यंतचा प्रवास अत्यंत खडतरतेने पार पाडला. वयाच्या अवघ्या 25 व्या

ISBN-978-81-928733-3-6

वर्षी आपली जीवन यात्रा संपविणारे भगवान बिरसा भारतीय इतिहासात अजरामर ठरतात. म्हणूनच आजही आदिवासी "बिरसाई एक बिरसा दे, लढाईचा वारसा दे, उलगुलान घोष दे, आदिमांचा लढा निर्णायक होऊ दे" असे मागणे मागतात.

**संदर्भ ग्रंथः**


1) गोपी कृष्ण कुॅंवर, बिरसा मुंडा, ज्ञान गंगा, प्रकाशन दिल्ली, 2011.

2) शेषराव मडावी, गोंडवानाचा सांस्कृतिक इतिहास, सुधीर प्रकाशन, वर्धा, 2011.

3) संपा, विनायक तुमराम, शतकातील आदिवासी कविता, हरीवंश प्रकाशन, चंद्रपूर, 2003.

4) शेषराव मडावी, आदिवासी महानायकाचे चरित्र, सुधीर प्रकाशन, वर्धा, ति.आ. 2019.

5) संपा, शेषराव नेवारे, शहीद आदिवासी गोवारी, अभिवादन विशेषांक, 2019.

6) संपा, सुन्हेरसिंह ताराम, गोंडवाना दर्शन, दिल्ली, जून 2016.


***